

# चौकटी बाहेर

आकाश खांडके

# चौकटीबाहेर

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# चौकटीबाहेर

आकाश उमेश खांडके

ई साहित्य प्रतिष्ठान

# चौकटीबाहेर

**लेखक - आकाश उमेश खांडके.**

पत्ता - ' कृष्णा ' आर – 6, अयोध्या पार्क, कावळा नाका, कोल्हापूर 416003

फोन - 9552959699

ई-मेल - akashkhandke1@gmail. com

संकलन - आदित्य जोशी

मुखपृष्ठ - प्रज्वल चौगुले, निशांत गोडसे

**सूचनाः**

सर्व हक्क लेखकास्वाधीन. भारतीय आणि आंतरदेशीय कॉपीराईट कायद्यान्वये संरक्षित. या पुस्तकाचा कोणताही भाग लेखकाच्या पूर्वपरवानगीशिवाय पुनर्मुद्रित, फोटोकॉपी, इलेक्ट्रॉनिक, नाट्य अथवा चित्रपट या प्रकारे वापरण्यास मनाई आहे.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २२ मे २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.



माझं नाव आकाश उमेश खांडके.


सध्या मी इंजिनीअरिंगच्या चौथ्या वर्षात शिकत आहे.बारावी झाली आणि सगळ्यांप्रमाणे मीसुद्धा इंजिनीअरिंगला प्रवेश घेतला. कॉलेज मात्र कोल्हापूरात नसून इचलकरंजीला होतं. त्यामुळे कितीही नाही म्हटलं तरी दिवसातले प्रवासाचे दोन तास मला मोकळे मिळायचे.या दोन तासांत काय करावं हा एक मोठा प्रश्न माझ्यासमोर होता.

कुठेतरी डोक्यात असा विचार आला की आपण ज्या कथा वाचतो तसं काहीतरी लिहायचा प्रयत्न केला तर?असा विचार आला आणि मी त्या प्रवासातले रोजचे दोन तास मार्गी लावायचे ठरवले. इंजिनीअरिंगनेच कुठेतरी माझ्यातला लेखक बाहेर आणला.

मी लिहायला लागलो कारण त्या आधी मला वाचनाची गोडी लागली आणि त्याचं सगळं श्रेय मिहीर मदनाईक नावाच्या माझ्या मित्राला जातं. त्याने मला रत्नाकर मतकरी यांची रंग आंधळा ही गोष्ट सांगितली. कदाचित हीच माझी लिहितं होण्याची पहिली पायरी होती.

मी लिहायला लागलो आणि माझे काही निवडक मित्र ते वाचायचे. तिथून चालू झालेला प्रवास आज माझ्या तिसऱ्या पुस्तकापर्यंत पोहचला आहे. या पूर्ण प्रवासात माझ्या अजून एका मित्राचं खूप योगदान आहे. आदित्य जोशी नावाचा हा मित्र माझ्या प्रत्येक गोष्टीचं संकलन करतो.


घरातल्या लोकांची साथ आहेच पण त्याचसोबत हे मित्र आहेत म्हणून माझ्यातला लेखक आज इथवर पोचलाय.




२०१७ साली प्रकाशित झालेली मा. आकाश खांडके यांची “अपरिचित” आणि “क्षण” ही दोन्हीही पुस्तके वाचकांना अत्यंत आवडली. अपरिचितचे लाखाहून अधिक डाऊनलोड्स झाले. शेकडो लोकांनी पत्रे, फ़ोन आणि whatsapp वरून आपल्या प्रतिक्रिया कळवल्या. श्री. आकाश खांडके यांच्या लेखनाचे अनेक Fans असून त्यात “चौकटीबाहेर” मुळे भरच पडेल.

आपणही ही पुस्तके वाचावी आणि त्यांवर आपले मनापासून अभिप्राय द्यावे असा आमचा आग्रह राहील.

- अपरिचित: गूढकथासंग्रह : आकाश खांडके
  - http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/aparichit_akashkhandke.pdf
- क्षण (लघुनिबंध): आकाश खांडके
  - http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kshan_akashkhandke.pdf



# मनोगत

माझी पहिली गोष्ट एक गूढ कथा होती. तिथून हा प्रवास चालू झाला. त्यानंतर लिहिलेल्या गूढ कथा मी माझ्या मित्रांना पाठवायचो. या सगळयांतून “अपरिचित” लोकांसमोर आलं.

गूढकथांवर तर माझी बऱ्यापैकी पकड आहेच पण नंतर असं वाटलं की प्रेमावर लिहायचा प्रयत्न केला तर! आणि त्यातून “क्षण” प्रकाशित झालं.

या दोन्ही पुस्तकांमध्ये एक साम्य होतं आणि ते म्हणजे त्यातील बऱ्यापैकी गोष्टी, विचार मी रचलेले आहेत. थोडक्यात काय तर ते सगळं काल्पनिक आहे.

पण “चौकटी बाहेर”हा लेखसंग्रह या वरच्या दोन्ही पुस्तकांना अपवाद आहे. यात मी अशा गोष्टी लिहिलेल्या आहेत ज्या माझ्याबरोबर प्रत्यक्ष घडल्या आहेत, कदाचित तुमच्या बरोबर ही घडल्या असाव्यात. खूप मोठं किंवा अनपेक्षित असं यात काहीच नाही.

“चौकटीबाहेर”म्हणजे माझ्या बरोबर घडलेले छोटे छोटे प्रसंग आणि त्यावर माझा चौकटीबाहेर जाऊन केलेला थोडासा विचार.

आपलं आयुष्य म्हणजे एक चौकटच आहे. आपण या जन्म मरणाच्या चौकटीतून नाही सुटू शकत पण आपण त्या चौकटी बाहेरचा विचार मात्र नक्की करू शकतो.

आशा करतो की तुम्हाला हा माझा “चौकटी बाहेर”चा विचार आवडेल.

-

आकाश खांडके

# रेखा

आमच्या गावाकडे सगळी घरं जोडलेली आहेत. नात्यांनी सुद्धा आणि भिंतींनी सुद्धा. दोन घरामध्ये एकच भिंत. असंच एकदा गावाला गेल्यावर आमच्या स्वयंपाकघरात मी जेवत होतो. जेवता जेवता एकदमच एक विचित्र आवाज कानावर पडला. तो आवाज इतका विचित्र होता की मी खरचं घाबरलो. आवाज शेजारच्या घरातून येत होता हे मात्र नक्की.

तसं त्या घरातल्या लोकांना मी ओळखतो. त्यांच्या घरातील सगळेच लोक शांत आहेत. मग हा विचित्र आवाज कसला? हा विचार चालू असतानाच माझी आजी मला काय हवं नको हे बघायला स्वयंपाक घरात आली. बरोबर संधी साधून आवाज कानावर पडताच मी हा कसला विचित्र आवाज म्हणून तिला लगेच विचारलं. माझा प्रश्न आणि तोंडावरचे भाव बघून ती हसली आणि म्हणाली “अरे शेजारची रेखा हसत आहे. “आता ही रेखा कोण?” माझी आजीही माझ्या सारखीच हुशार आहे. मी प्रश्न विचारण्याच्या आधीच तिने त्याचंही उत्तर दिलं. “अरे! शेजारी ती नवीन कामाला लागली आहे. त्यांच्या घरातलं आणि त्यांच्या किराणा मालाच्या दुकानातील सगळं काम करते.” एवढं सांगून आजी गेली.

जेवण संपेपर्यंत तो आवाज कानावर पडत होता. कारण ती बोलताना प्रत्येक वाक्यात हसायची. मघाशी विचित्र वाटणारा आवाज आता ओळखीचा

वाटायला लागलेला. ती मनमोकळं हसत होती म्हणून कदाचित विचित्र वाटत होतं.

दोन तीन दिवसांनंतर एके सकाळी मी घराच्या पुढच्या खोलीत टीव्ही बघत बसलेलो तेवढ्यात गच्चीतून आज्जीने कुणाला तरी हाक मारली आणि ती स्वतः घरातून खाली गेली. काय झालं असावं, या विचारात मी गच्चीतून खाली बघायला लागलो तर आजी एका मुलाला घरातली जुनी चप्पल देत होती.

मुलगा जरा विचित्र होता. खाली येऊन आजीसोबत बोलल्यावर कळलं की तो रेखाचा मुलगा होता. त्याचं मानसिक संतुलन थोडं बिघडलेलं आहे.

आता मात्र रेखा या विषयात मला खोलवर जाण्याची इच्छा झाली.

आजीला एका जागी बसवून मी सगळं विचारलं आणि ते ऐकून मी स्तंभित झालो.

रेखाची दोन मुलं आहेत. साध्या भाषेत बोलायचं तर दोघेही वेडे आहेत. नवरा काहीही काम करत नाही. मस्तपैकी दिवसभर बोंबलत फिरतो आणि दारू पितो. शेजारी रोजच्या कामाचे तिला शंभर रुपये मिळतात. घरची परिस्थिती एवढी वाईट आहे की घरात गॅस नाही. रोजच्या पैशातून थोडी लाकडं आणि मीठ मसाला खरेदी करून स्वयंपाक करायचा.

आणि एखाद्या दिवशी काम नसलं तर तिला शेजारी बोलवतसुद्धा नाहीत. आता त्या दिवशी चूल कशी जळते ते ती आणि देव जाणे!

तसं मला कशाचंही वाईट वाटत नाही. मग यासाठी मला दगड म्हणा किंवा भावशून्य.

पण हे सगळं ऐकून मला खरंच भरून आलं.

विचार केल्यावर जाणवलं की या बाईकडे हसण्यासाठी एकही कारण नाही आणि तरीही ती एवढी खुश असते.

थोडक्यात काय, तर ती मिळेल तो थोडाफार आनंद हसून साजरा करते आणि आपण आज काल फक्त दुःखी होण्याची कारणे शोधत असतो. ती आहे त्यामध्ये खूष आहे. हा विचार चालू असतानाच तिचा तो आवाज कानावर पडला.

आणि या वेळेस मीही मनसोक्त हसलो.. ..

# नकळत प्रयोग

बसमध्ये बसून कॉलेजला निघालो आहे. खरंतर आज माझी टेस्ट आहे पण अजून मी पुस्तकंच विकत घेतलेली नाहीत. इंजिननिअरिंग म्हटलं की एवढं चालायचं. टेस्टला जाऊन बसलो की मित्र आणि सर दोघे पण खूष. मित्र खूष कारण मीही त्यांच्यासारखा गप्प बसलो आहे आणि सर खूष कारण टेस्टला १००% हजेरी लागली.

जरा वेळ आहे म्हणून म्हटलं लिहूया.

आज तुम्हांला परत जरा भूतकाळात घेऊन जातो. तसं जास्ती मागे नाही घेऊन जाणार. आपण माझ्या अकरावी बारावीच्या काळात जाऊ या. अकरावी बारावीला मी शिकायला मुंबईला होतो. कदाचित हे मी तुम्हांला आधी कुठेतरी सांगितलंय. असो!

मी अंधेरी पश्चिममध्ये एका मोठ्या सोसाटीमध्ये राहायचो. मोठी म्हटलो कारण ती खरंच खूप मोठी होती. मी तेराव्या मजल्यावर राहायचो. माझ्या फ्लॅटमध्ये आम्ही पाच लोक होतो आणि बाथरूम दोन. त्यामुळे रोज कुणाला ना कुणाला तरी उशीर व्हायचा.

फ्लॅटपासून कॉलेज चालत पंधरा मिनिटांच्या अंतरावर होतं. त्या मुळे उशीर झाला की रिक्षा करून जाणे हा एकमेव पर्याय असायचा. रोज चालत जाणारा मी उशीर झाल्यावर मात्र रिक्षा स्टॉपपर्यंत मात्र पळत जायचो. रिक्षात बसून "भैया रेल्वे स्टेशन पर चलो"असं म्हटलं की तो व्यवस्थित वेळेत तिथे नेऊन सोडायचा.

माझं कॉलेज रेल्वे स्टेशनच्या अगदी समोर होतं. वेळेत पोहोचलो तरी रिक्षाने गेलो की दरवेळेस माझं पाच रुपयांचं नुकसान व्हायचं. कसं ते सांगतो.

माझ्या फ्लॅटपासून कॉलेजपर्यंत जाण्यासाठीचं भाडं पंधरा रुपये होतं. सुट्टे पैसे नसल्यामुळे मी कायम वीस किंवा पन्नास ची नोट काढून द्यायचो. खूपदा असं होतं की आपल्याला गडबड आहे हे पुढच्याला कळलं की तो त्याचा पुरेपुर गैरफायदा घेतो. हे माझ्यासोबत मात्र दरवेळेस व्हायचं. त्या रिक्षावाल्याला कळायचं की या मुलाला गडबड आहे. मग तो स्वतः मधला कलाकार जागा करत बारीक तोंड करून म्हणायचा "पांच का छूट्टा नही है" आणि त्याच्या या निर्माण केलेल्या परिस्थितीवर माझ्याकडे काहीच उत्तर नसल्यामुळे मी त्याला वीस रुपये देऊन कॉलेजकडे पळायचो.

ही बाब ऐकायला वाचायला क्षुल्लक वाटली असेल तुम्हांला. पण माझ्यासाठी ती मोठी गोष्ट आहे. मला त्याला ते पाच रुपये देण्याचं वाईट वाटत नव्हतं. मला वाईट वाटत होतं की तो ते फुकटात मिळवायचा.

परत एके दिवशी असंच झालं. मला आवरायला वेळ झाला आणि रिक्षाकडे धावलो. आज एवढी गडबड झालेली की मी त्याला म्हणलो “दादा जरा लवकर स्टेशन जवळ चला”त्याने वेळेत तर पोहोचवले आणि पंधरा रुपये घेऊन पाच परत सुद्धा दिले. हे सगळं काय झालं हे कळायला मला थोडा वेळ लागला. बऱ्यापैकी वेळेस एवढ्या सकाळ सकाळी तोच असायचा रिक्षा स्टॉप वर. तो एक मध्यमवर्गीय मराठी माणूस होता. पण मी हिंदीत बोलल्यामुळे तो मला बाहेरचा समजायचा. ज्या दिवशी मी मराठीत बोललो त्या दिवशी तो ही मराठीत बोलला. आणि काही क्षणात आमचं एक वेगळंच नातं जडलं.

मी इथे कुठेही मराठीचा प्रचार करण्यासाठी किंवा मराठी हिंदीपेक्षा भारी आहे हे सांगण्याचा, तुम्हाला समजावण्याचा प्रयत्न करत नाही आहे.

मला त्या गोष्टी पटतच नाहीत. हिंदी पण आपली मराठी पण आपली. पण एक गोष्ट नक्की असते की आपल्याला पुढच्या व्यक्तीसोबत जुळायला काहीतरी माध्यम लागत. मग ते माध्यम काहीही असू शकत अगदी भाषेपासून त्वचेच्या रंगापर्यंत. मी मराठी बोललो आणि कदाचित त्या व्यक्तीला या एवढ्या अफाट मुंबईमध्ये मी त्याचा कोणीतरी वाटलो असेन. त्या दिवशी जाताना तो हसून गेला. खूप खूप छोटी गोष्ट आहे ही. अगदी त्या पाच रुपयांसारखी! पण माझ्या मनाला ती चटका लावून गेली.

त्या दिवशी मी ठरवलं की या पुढे आपण स्वतः बोलताना मराठीत बोलायचं. खूप कमी वेळेस असं होतं की पुढच्या व्यक्तीला ते कळत नाही. आणि

त्याला कळलं नाही हे आपल्याला त्याच्या तोंडाकडे बघून कळतंच की त्याला आपलं बोलणं कळलेलं नाही. तिथं हिंदी आहे इंग्लिश आहे.

पण आपणच आधी वेगळ्या भाषेत बोलायचं आणि परत ओरडत बसायचं की मुंबई महाराष्टाची राजधानी असून इथे आजकाल कोणी मराठी बोलतच नाही. या गोष्टीचे मला अजून दोन अनुभव आले. दुबईमध्ये अटलांटिस हॉटेलमध्ये मी जेवत होतो. मला पाण्याची बाटली हवी होती पण कुठल्याच वेटरचं लक्ष नव्हतं. आमच्या आमच्यातील मराठी बोलणं ऐकून एक वेटर आला आणि हसला. तो सातारचा होता. त्याने लगेच पाणी आणून दिलं. पाच मिनिटं थांबून आमच्यासोबत बोलला. जेवढा आनंद त्याला झालेला तेवढाच आम्हांलाही झाला.

दुसरा प्रसंग भरपूर मजेशीर आहे. मागच्या महिन्यात आम्ही मित्र बंगलोरला गेलेलो. सकाळी ट्रेनमधून उतरल्यावर आम्ही प्लॅटफॉर्मवरून बाहेर जाण्याचा रस्ता शोधत होतो. माझा मित्र म्हणाला की हिंदीत नको इंग्लिशमध्ये बोल. इथे लोकांना हिंदीही क्वचितच कळते. मला तिथे एक माणूस दिसला. मी त्याच्या दिशेने गेलो आणि म्हणालो “काका बाहेर कुठून जायचं” आणि तो म्हणाला “इथून पुढे जाऊन डावीकडे वळा”. यानंतर मी मित्राकडे बघून फक्त हसलो.

# यात्रा

मागच्या पंधरा वीस दिवसांत मी काहीच लिहिलेलं नाही. त्याचं एकमेव कारण म्हणजे वेळेचा अभाव. खूप दिवसांनी माझ्या असं लक्षात आलं की लेखका बरोबर आपण एक इंजिनियरसुद्धा आहोत. त्यामुळे मी बेंगलोरला गेलेलो. हसू नका. त्यालाही एक कारण आहे. बेंगलोरला एक प्रदर्शन होतं. ते मी एक इंजिनियर या नात्याने बघायला गेलेलो. लेखक बरोबर होता पण दिवसभर मी त्याला हॉटेलमध्येच ठेवायचो.

तिथून सोमवारी सकाळी परत आलो आणि माझी काकी म्हणाली की रात्री आपल्याला पाटणजवळ वाकोबाच्या यात्रेला जायचं आहे. मी लगेच हो म्हणालो. लगेच म्हणालो कारण या सगळ्यांत मला काहीच त्रास नव्हता. गाडीतून बसून जायचं, देवाचं दर्शन घ्यायचं, तिथे जेवायचं आणि परत बारापर्यंत घरी. तो पूर्ण दिवस मी लोळत घालवला. आम्ही संध्याकाळी सातच्या सुमारास निघालो. साडे आठला आम्ही मंदिराच्या दारात होतो. आमची गाडी नाही तर विमान आहे आणि डॅड त्याचे पायलट.

तिथे पोहोचलो तर आरती नुकतीच सुरू झालेली. मी गाडीतून उतरून तिकडे पळत गेलो. सगळं मंदिर लोकांनी गजबजलेलं. थोडक्यात वर्णन करायचं तर मुंबईची लोकल. पाटणवरून आमचे चुलत काका, त्यांची मुलं, मुली सगळेच आलेले. त्या आरतीतच सगळ्यांची भेट झाली.

त्यानंतर आम्ही गाभाऱ्यात दर्शन घेण्यासाठी गेलो. जाताना मी जरा थांबलो. गर्दी कमी झाली की आत जाऊया, असा माझा विचार होता. पण नंतर मला असं जाणवलं की हे शक्य नाही. त्यामुळे मीही आमच्या काकीसोबत आत घुसलो. मी खरंतर गाभाऱ्यात गेलो पण आत गेल्यावर असं वाटलं की मी  कुठेतरी माफीनामा ऐकायला आलोय. आणि मला अक्षरशः हसू आलं. का आलं? ते पुढे सांगतो.

तिथे देवाच्या मूर्तीबाजूला पुजारी बसलेला. एक माणूस पुढे आला व त्याने देवासमोर हात जोडले. त्यानंतर त्या व्यक्तीने पुजाऱ्याला त्याचं पूर्ण नाव सांगितलं आणि त्याच्या घरातला काहीतरी प्रॉब्लेम सांगितला. कदाचित त्याचा काहीतरी नवस फेडायचा राहिलेला. नीट आठवत नाही मला पण एकंदरीत देवा मला माफ कर, आमच्यावर जे काही संकट आलंय ते टळू दे. असंच काहीतरी. हे सगळं त्या पुजाऱ्याने ऐकून घेतलं आणि परत तेच सगळं देवाला सांगितलं तेही मोठ्या आवाजात. सगळ्यांना ऐकू जाईल असं.

मग तो माणूस परत एकदा हात जोडून निघून गेला.

हे झालं एक उदाहरण. अशी मजा तिथे यात्रेच्या दिवशी भरपूर वेळ चाललेली. एका बाईने पुजाऱ्याकडे प्रसाद मागितला तर तो म्हणाला की तुम्ही कुठं प्रसाद दिलाय देवाला?

मी पाया पडून तिथून बाहेर आलो. बाहेर बसून मस्त जेवलो. सगळ्यांची गाठ भेट घेऊन परत निघालो. घरी येऊन झोपलो.

हा झाला प्रसंग. आता जरा याच्यावर विचार मांडूया. समजा मी उद्या तुमच्याकडून काही पैसे उधार घेतले. काही म्हणण्यापेक्षा एक लाख रुपये म्हणूया. दोन महिन्यांनी परत करतो असं म्हटलं आणि परत दिलेच नाही तर! काय कराल हो तुम्ही? मला असं वाटतंय की आधी प्रेमाने मागाल. आणि शेवटची पायरी म्हणून पोलीस केस कराल.

काळजी करू नका मी नाही मागणार पैसे तुमच्याकडे.

चला मुद्द्यावर येऊया. मी कितीही चांगला मित्र असलो तरी पैसे पैसे असतात आणि यात काहीच वाद नाही.

हे सगळं बरोबर आहे पण ही मानवी मानसिकता झाली. उद्या देवाला कुठल्या गोष्टीच्या बदली काहीतरी देतो असं तुम्ही म्हटलं आणि नाही दिलं तर तो तुम्हाला त्रास देईल?

माणसाचीच मानसिकता देवात असेल तर मला सांगा त्याला माणूस सोडून देव का म्हणायचं?

आणि दुसरी गोष्ट मी म्हणतो की देवासोबत व्यवहार का करायचा? अरे जे पाहिजे ते हक्काने मागा त्याला. तुम्हाला देणार नाही तर कुणाला देणार! आपण देवाची मुलं आहोत असं मी तरी लहानपणापासून ऐकत आलो आहे. म्हणजे थोडक्यात देव आपल्या आईच्या जागी आहे. मग मला सांगा कुठला मुलगा आई बरोबर व्यवहार करतो?

हे सगळं काही लोकांना पटेल काही लोकांना कदाचित नाही पटणार. तो प्रत्येकाचा वैयक्तिक विचार आहे. पण ज्यांनी हा लेख व्यवस्थित वाचलाय त्यांना एक प्रश्न नक्की पडला असणार की तू पण गेला होता की!

यामध्ये दोन गोष्टी आहेत. एक म्हणजे यात्रेला जाणे ही एक प्रकारची परंपरा आहे आणि मला त्यात काही चुकीचं वाटत नाही. देव सगळीकडे आहे हे मलाही मान्य आहे, पण थोडा वेळ काढून लोकांनी देवासाठी बांधलेल्या घरात जाऊन देवाला भेटायला मला काहीच अडचण नाही.

आता दुसरा मुद्दा! मला असं वाटत की देवावर विश्वास ठेवा, काही पाहिजे असेल तर स्वतःच्या कष्टाबरोबर जरा हट्टसुद्धा करा.

पण देवाचा माणूस करून त्याचा अपमान तेवढा करू नका.

# प्रेम

“प्रेम”हा शब्द किंवा ही भावना आजकाल खूप साचेबद्ध झाली आहे असं मला तरी वाटतं. म्हणजे काय तर प्रेम म्हटलं की आपल्याला डोळयांसमोर एक मुलगा आणि मुलगी दिसते.

नाहीतर मग आई दिसते. दिसते ना?

किंवा एखादी सोडून गेलेली व्यक्ती आठवते. किंवा एखादा रोमँटिक सिनेमा आठवतो. सरासरी लोकांचं प्रेम इथेपर्यंतच सीमित असत.

आज आपण जरा वेगळ्या प्रेमाबद्दल बोलूया.

आता प्रेम म्हटलं की भूतकाळ हा येणारच त्याला काही पर्याय नाही. त्या दोघांचं नातं आपल्याला कळण्यापलीकडच आहे.

तर चला! जरा मागे जाऊ या.

आठवीच्या वार्षिक परीक्षेचा निकाल लागला आणि रिपोर्ट कार्ड बघून मला एक गोष्ट कळली की आपल्याला “गणित”नावाचा प्रकार खूपच कमी प्रमाणात येतो. मी गणितात पास तर झालेलो पण ते मार्क माझे नसून मॅडमला माझ्यावर आलेल्या दयेचे होते. मला पण त्याची लाज वाटत होती पण मला खरंच गणित येत नव्हतं.

यावर तोडगा म्हणून घरी असं ठरलं की मला गणिताचा क्लास लावायचा. तसे कोल्हापुरात भरपूर क्लास आहेत पण मी आमच्या शाळेतल्या मॅडमकडेच जायचं असं ठरवलं.

त्याची दोन कारणे होती. पहिलं म्हणजे मला गणित येत नाही हे त्यांना माझ्यापेक्षा चांगल माहित होतं. त्यामुळं मला टेन्शन घेण्याची काही गरज नव्हती आणि दुसरं म्हणजे माझे काही मित्र तिथे आधीपासून जायचे.

त्यामुळे मी तो क्लास लावला. माझा एक मित्र आहे. नाव? सोडा ना! नावात काय ठेवलं आहे? तर मी त्या मित्रालाही चल असं म्हणत होतो. पण त्याला स्वतःवर नाही, स्वतःच्या "गणितावर" जरा जास्ती विश्वास होतो. त्यामुळे मला माझ्या मित्राला सोडून पुढे जावं लागलं. सहा महिने मला माझी काकी गाडीवरून सोडायची. क्लास तसा जरा लांबच होता. सहा महिन्यांनंतर परीक्षा झाली. या वेळेस चित्र जरा वेगळं होतं. माझे मार्क जरा वाढलेले, अर्थात् क्लास मुळेच.

पण मजेची गोष्ट म्हणजे त्या क्लासला न येणाऱ्या मित्राचे मार्क, गणित त्याला दगा देऊन सोडून गेल्यासारखे होते. आता त्याचे डोळे उघडले. आणि त्यानेही क्लास लावायचा ठरवला. थोडक्यात काय तर मला सहा महिने आधी कळलेली गोष्ट त्याला सहा महिने उशिरा कळली. असो! चालायचंच.

त्याच्या घरापासून तर क्लास अजूनच लांब होता.

तो क्लासला यायला लागला आणि यामुळे दोन गोष्टी घडल्या. त्यातली माझ्या फायद्याची एकच होती.

आधी फायद्याचं बघू नंतर तोट्याचं.

तो यायला लागल्यामुळे मला काही जरी शंका आली तरी मी त्याला विचारायचो. त्यामुळे माझ्या शंकांचं लवकर निरसन होई.

दुसरी गोष्ट अशी घडली की तो बरोबर असल्यामुळे दोघांनाही घरात असं सांगण्यात आलं की आता तुम्ही एकत्र जात जा आणि ते पण सायकल वरून. सायकल चालवायला मला कधीच आवडलं नाही.

तरीपण मी माझी सायकल दुकानात नेऊन रिपेअर करून आणली. तो त्याच्या घरापासून माझ्या घरी यायचा आणि तिथून आम्ही दोघे सायकल वरून क्लासला जायचो.

पहिले काही दिवस हे छान चाललेलं. पण काहीच दिवसात माझी सायकल आजारी पडली. तिला ठीक व्हायचं नव्हतं का मला तिला ठीक करायचं नव्हतं माहिती नाही पण तो माझ्या घरी यायचा आणि फक्त माझी सायकल खराब आहे म्हणून तिथून आम्ही क्लासपर्यंत सायकल हातात धरून चालत जायचो. त्या दोन वर्षात त्याची सायकल खराब झाली अस खूप कमी वेळा झालं. पण म्हणून तो कधीच मला सोडून एकटा गेला नाही.

सगळं माहित असूनही तो माझ्या घराच्या दारात यायचा. मी हसायचो, तो सायकल वरून उतरायचा आणि आम्ही चालत क्लासला जायचो. कुणालाच काहीच बोलायची गरज नव्हती.

सगळं माहित असूनही माझ्यासाठी तो रोज चालत यायचा. कदाचित यालाच प्रेम म्हणतात.

माझ्या मते”यात माझा काय फायदा” ही भावना सोडून जे काही असतं ते म्हणजे प्रेम.

आणि या सगळयाचा शेवट म्हणजे आम्हां दोघांनाही दहावीला गणितात नव्वदच्या पुढे मार्क मिळाले.

# दिवाळी

दिवाळीनिमित्त काही लोकांना मिठाई वाटायला बाहेर पडलो. दर वेळेस माझी काकी वाटायची. पण मागची दोन वर्षे मी जायला सुरुवात केली आहे.

मिठाई का?

असा तुमचा प्रश्न असेल तर फक्त एक दिवाळीची भेट म्हणून, बाकी काही नाही. सगळयांना मिठाई वाटत वाटत एका डॉक्टर काकींना मिठाई देण्यानिमित्त सी. पी. आर मध्ये गेलो. या निमित्ताने मी सी. पी. आर पहिल्यांदा गेटच्या आतून बघितलं. एवढया मोठ्या दवाखान्यात त्यांना शोधेपर्यंत खूप वेळ निघून गेला. बघेल तिकडे नुसती गर्दी आणि घाण. मनात असा विचार आला की 'काम नसतं तर मी या दवाखान्यात आयुष्यात कधी पायही ठेवला नसता'. भरपूर फिरल्यानंतर माझ्या कष्टाचं फळ म्हणूनच मला त्या डॉक्टर काकींच केबिन सापडलं. आत गेलो तर तिथे एक जोडपं आपलं अंदाजे सहा महिन्यांचं रडवं बाळ घेऊन उभारलेलं. पोशाखावरून त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा तसा मला बऱ्यापैकी अंदाज आला. खूप गरीब वाटत होते ते दोघे. डॉक्टर काकी त्यांच्या असिस्टंट डॉक्टरला इंग्रजीमध्ये सांगत होत्या की 'बाळाची अवस्था खूप नाजूक आहे. काय होईल काही सांगता येत नाही'. ते ऐकून त्या खोलीत त्या क्षणाला फक्त आणि फक्त मलाच वाईट वाटलं.

त्या आई बाबांना कळू नये म्हणून सगळं संभाषण इंग्रजीमध्ये चाललेलं. आणि त्या दोन्ही डॉक्टरांना त्याचा काहीही फरक पडत नव्हता.

आई बाळाला सांभाळण्यात व्यस्त होती. माझं लक्ष या सगळयांकडून त्या बापावर गेलं. तो मात्र 'काय करू? कसं करू? पुढे काय होणार' या आणि अशा असंख्य प्रश्नांमध्ये पूर्णपणे अडकलेला.

एक गोष्ट मात्र नक्की की त्याची दिवाळी सी. पी. आर मध्येच जाणार होती.

हा झाला गोष्टीचा, प्रसंगाचा भाग. पण हा प्रसंग खरंच विचार करण्याजोगा आहे. त्या माणसाकडे उपभोगण्यासाठी काहीच नव्हतं. आपल्याकडे सगळं असून आपल्याला त्याची जाणीव नसते.

आपण दिवाळी खूप हलक्यात घेतो. कपडे, फटाके या आपल्यासाठी क्षुल्लक गोष्टी असतात. किंमत नाही असा भाग नाही पण या आणि येणाऱ्या दिवाळीला एक काम करूया! गोष्टींचा, कपड्यांचा, फराळाचा, घरी सगळयांबरोबर बोलत बसण्याचा जरा जास्त आस्वाद घेऊया.

दिवाळी जरा जास्त साजरी करूया.

आयुष्य जरा जास्त जगू या.

# भीती

रविवार नंतर सोमवार येतो याचं मला खरंच मनापासून वाईट वाटतं. सोमवार आला म्हणजे कॉलेजला जावं लागणार आणि कॉलेज म्हटलं की लेक्चर आलेच. अभ्यास शेवटी आपल्यालाच करावा लागतो, मग लेक्चर कशाला?

पण काय करणार? काही गोष्टी कराव्या लागतात.

आता कॉलेजला आहे, काही वर्षांआधी शाळेला होतो.

शाळा संपत आलेला एक प्रसंग आठवला आज.

मी माझ्या दहावीत भरपूर काही केलं. मजाही केली आणि भरपूर अभ्यासही केला. काही असे मित्र झाले नववी दहावीत, की जे आजही मला तेवढेच जवळचे आहेत. शाळा संपली की ते मित्र दुरावतात असं मी खूप लोकांकडून ऐकलंय पण मी आनंदाने सांगू शकतो की मी त्याला अपवाद आहे. दहावी छान चाललेली आणि अचानक एके दिवशी बोर्डाच्या परीक्षेचं वेळापत्रक लागलं. ते लागणार यात काहीच वाद नव्हता. दहावीत शिकतोय म्हटल्यावर दहावीची परीक्षा तर द्यावीच लागणार पण वेळापत्रक बघितल्यावर कळलं की पहिला पेपर गणिताचा आहे. “गणित”हा नुसता शब्द ऐकला तरी मला कसंतरी होतं.

असं नाही की मी गणिताचा अभ्यास केला नव्हता किंवा मला ते अजिबातच जमत नव्हतं. सगळ्यांत जास्त अभ्यास मी गणिताचाच करत होतो. पण त्या सगळ्या अभ्यासाच्या मागे एक भीती होती. आणि ती भीती बोर्डाच्या परीक्षेत गणिताचाच पेपर पहिला असणार हे बघून अजून माझ्या डोक्यावर चढून

बसली. काही गोष्टी अशा असतात की आयुष्यात ज्यावर खरंच आपलं नियंत्रण नसतं. कदाचित त्या आपल्याला फक्त त्रासदायक वाटत असतात पण त्यांना सोडूनही चालत नाही.

माझ्या आयुष्यातली ती गोष्ट म्हणजे गणित.

आता तुम्ही म्हणाल की दहावीत होता म्हटल्यावर कधी ना कधी गणिताचा पेपर तर द्यावाच लागणार होता.

हो, तुमचं म्हणणं मान्य आहे पण तो पहिलाच पेपर असणार याची मला जरा जास्त भीती वाटत होती.

आणि त्याचं मुख्य कारण असं होतं की समजा पहिलाच पेपर खूपच वाईट गेला तर पूर्ण परीक्षा होईपर्यंत त्याचं टेन्शन डोक्यावर राहणार आणि त्या नादात कदाचित सगळीच परीक्षा वाईट गेली तर?

आणि सगळयात मोठी भीती म्हणजे आपण गणितात नापास झालो तर?

या "तर"ने मला खूप त्रास दिला. वेळापत्रक लागल्यानंतर मी बाकी सगळा अभ्यास कमी करून अजूनच गणिताच्या मागे लागलो. बाकीचे विषय मला तसे बऱ्यापैकी यायचे आणि मुख्य म्हणजे मला त्याचं टेन्शन नव्हतं. या विचाराबरोबर आणि अभ्यासाबरोबर दिवस हळूहळू सरत गेले.

दिवसांच्या पुढे जाण्याबरोबर परीक्षेची वेळही जवळ येत चाललेली. आणि शेवटी परीक्षेच्या आधीची संध्याकाळ आली. हॉल तिकीट पासून पेन, पेन्सिलपर्यंत सगळी तयारी झालेली. तयारी नव्हती ती फक्त माझ्या मनाची.

मला खूप टेन्शन आलेलं. जेवायला बसल्यावर माझे डॅड माझ्याकडे बघून हसत म्हणाले "झाला का अभ्यास? "

मी मानेनेच हो म्हणालो. बोलायची इच्छा आणि गरज दोन्ही नव्हती. त्यांनी थोडयावेळाने परत विचारलं "टेन्शन आलंय? "

या वेळेस मात्र मी तोंडाने हो म्हणालो.

त्यानंतर त्यांनी जे सांगितलं ते खरंच भारी होतं!

ते म्हणाले, “मला सांग, उद्या सगळयात वाईट काय होऊ शकतं? “

मला त्या क्षणाला हा प्रश्न अपेक्षित नव्हता. त्यामुळे मी दोन मिनिटं थांबून म्हणालो, “नापास होईन”.

ते म्हणाले यापेक्षा वाईट काय होऊ शकतं का?

मी जरा विचार केला. पण यापेक्षा काहीच वाईट माझ्या डोक्यात आलं नाही. मग ते म्हणाले की नापास झालास तर परत पेपर देता येतो. या वेळेस नाही तर पुढच्या वेळेस सुटेल. पण त्या गोष्टीसाठी स्वतःला त्रास करून घेण्यात काय अर्थ आहे? तुझ्या हातात अभ्यास करणं होतं आणि तू तो प्रामाणिकपणे केला.

त्यामुळे आता झोप, उद्या जाऊन पेपर दे आणि विषय सोड.

एका क्षणाला मला हे पटलं. दुसऱ्या दिवशी मी शांतपणे पेपर लिहून आलो.

९२ मार्क मिळाले

आणि एक गोष्टही कळली की स्वतःच्या हातात जे काही आहे ते प्रामाणिकपणे करून विचार सोडून द्यायचा.

कदाचित त्या गोष्टीतून सगळं चांगलंच होणार असतं आणि वाईट झालं तरी ठीक आहे असं म्हणून परत त्याच्या मागे लागायचं.

ज्या दिवशी आपण प्रयत्न सोडू, त्या दिवशी काहीतरी वाईट होईल हे समजून जायचं.

# देव

टीव्हीवर काही कार्यक्रम सुरु होण्याआधी एक सूचना दिलेली असते की या कार्यक्रमातल्या सगळ्या घटना वास्तविक घडलेल्या आहेत. पण त्या घटनेशी जोडल्या गेलेल्या व्यक्तींच्या सुरक्षिततेसाठी आणि काही इतर कारणास्तव पात्रांची व घटनास्थळांची नावे बदलण्यात आली आहेत.

आपली पण आजची गोष्ट अशीच काहीतरी आहे. पण तुम्ही काळजी करू नका, प्रसंग समजायला तुम्हांला कुठलीही अडचण येणार नाही याची दक्षता मात्र मी घेईन कारण ते माझं कामच आहे.

सुरू करूया..

तर झालं असं की काही महिन्यांपूर्वी आम्ही मित्र मित्र बाहेरगावी फिरायला गेलो. मनाला जरा विरंगुळा आणि मित्र मित्र एकत्र राहून करायला मिळणारी मजा या दोन गोष्टी त्या ट्रीपचा मूळ मुद्दा होता. आम्ही तीन चार दिवस मनसोक्त फिरलो, खाल्लं आणि भरपूर मजा केली.

चार मधील तीन लोकं अगदी हेच सगळं करायला म्हणून आमच्या बरोबर घराबाहेर पडलेली. त्या तिघांमध्ये माझाही समावेश होताच. पण आमचा चौथा मित्र जरा वेगळा आहे.

त्यानेसुद्धा आमच्या बरोबर दंगामस्ती केली पण आमच्या बरोबर येण्याचा त्याचा वेगळाच उद्देश होता.

आम्ही ज्या गावी आलेलो तिथे त्याच्या प्रिय देवाचं खूप मोठं आणि प्रसिद्ध मंदिर आहे. कोल्हापूरातून निघण्याआधीच त्याने आम्हाला सांगितलं होतं

की ट्रिपमधील एक दिवस तो त्या मंदिरात जाणार आहे आणि तेही एकटं नाही तर तो आम्हाला सगळयांना घेउन जाणार आहे.

आम्ही पण हो म्हणालो. तसं मी पण अधूनमधून मंदिरात जातोच. त्यामुळे ही माझ्यासाठी काही मोठी आणि वेगळी गोष्ट नव्हती.

ठरल्याप्रमाणे आम्ही सगळे एके दिवशी त्या मंदिरात गेलो.

लांबूनच बघताना मला त्या मंदिराची भव्यता जाणवली. भव्यतेबरोबर त्या परिसरात स्वछता आणि शांतता सुद्धा होती. तो मित्र आधी एकदा येऊन गेलेला, त्यामुळे या वेळेस तो पुढे असायचा आणि आम्ही तिघे त्याच्या मागे. तो सांगेल तसं करत चप्पल ठेवून, पाय धुवून आम्ही मुख्य मंदिरासमोर पोहचलो. आत जातानाच “फोटो काढण्यास मनाई” हा फलक दिसला आणि मी खिशातून काढलेला फोन स्वतःशीच हसत परत खिशात ठेवला. आत गेल्यावर गाभाऱ्यासमोर जाऊन दर्शन घेण्याची एक मोठी लांब लचक रांग होती. मी नकळतच त्या रांगेत जाऊन उभारलो. पण तेवढ्यात त्या मित्राने मला मागे खेचलं आणि मंदिरामध्ये बसलेल्या एका व्यक्तीकडे घेऊन गेला. मित्राने त्याला पाचशे रुपये दिले आणि त्या व्यक्तीने आम्हांला पाचशे रुपयाची पोच दिली. तिथून आम्ही वेगळया रांगेत गेलो जी नेहमीच्या रांगेच्या पुढच्या बाजूला म्हणजेच गाभाऱ्याच्या अधिक जवळ होती. तिथे आम्हाला बसायला पण दिलं. “व्यवस्थित दर्शन” हा जो काही प्रकार असतो तो आमचा तरी व्यवस्थित झाला. थोड्याच वेळांत समोर असलेल्या पुजाऱ्याने आम्हांला उठवलं आणि आम्ही प्रदक्षिणा करून मागे फरशीवर बसण्यास निघालो. बसण्याकरिता जाताना मला एका बाजूला आरती चालू असलेली दिसली. बसण्यापेक्षा त्या आरतीला जाऊ असं डोक्यात आलं आणि आम्ही सगळेच तिकडे निघालो. तिकडे जाताना मघाशीच्याच माणसाने आम्हांला अडवलं आणि तिकडे जायचं नाही असं सांगितलं. मी का असं विचारणार एवढ्यात माझ्या मित्राने

मघाशी मिळालेली पोच पावती दाखवली. त्या नंतर त्या माणसाने तोंडावर एक गोड हसू आणत आम्हाला तिकडे सोडलं. आणि जाताना हे ही म्हणाला की “चिठ्ठी आहे ते आधी सांगायचं ना! ” आम्ही आरती झाल्यावर तिथे थोडावेळ बसलो आणि बाहेर पडलो.

तिथून बाहेर पडल्यावर एक गोष्ट जाणवली की त्या मंदिरात सगळं होतं, देव होता, भव्यता होती, शांती होती पण माणूसकी कुठेच नव्हती.

आमच्याकडे पावती नाही यावर त्या माणसाची प्रतिक्रिया आणि पावती आहे हे कळल्यानंतरची प्रतिक्रिया यातला फरक स्वतःच सगळं सांगून गेला. तिथे आम्हांला नाही तर आम्ही दिलेल्या पाचशे रुपयांना किंमत होती. आणि या सगळयात देव बाजूला राहून सगळाच एक बाजार झालेला.

भक्ती असावी, मंदिरात पण जावं, माझा काहीच विरोध नाही. पण जिथं त्याच देवाच्या नावाखाली बाजार होतो तिथे जाणं म्हणजे देवाचाच अपमान केल्यासारखं वाटतं मला.

मंदिर भक्तीच स्थान आहे आणि ते तेवढंच असाव.

# प्रवास

एका मित्राच्या घरात बसलोय. मित्र त्याच्या कामात व्यस्त आहे. बसून बसून कंटाळा आला म्हणून लिहायला सुरुवात केली आहे. पण आज विषय थोडा वेगळा आणि विचार करायला लावणारा आहे.

अकरावी बारावीला शिकायला मी मुंबईमध्ये होतो. का गेलो? हा निराळा विषय आहे. यावर कधीतरी सविस्तर बोलू. ती स्वतःमध्ये एक गोष्ट होऊ शकते.

माझं कॉलेज अंधेरीला होतं. अंधेरी म्हणजे अत्यंत गजबजलेला परिसर. दिवसात आमचे २ लेक्चर असायचे तेही तीन -तीन तासाचे. त्यामुळे खूप कंटाळा यायचा. माझ्या दोन आत्या मुंबईमध्येच राहतात. कधी कधी एखाद्या शनिवारी मी त्यांना भेटायला आणि स्वतःला विरंगुळा म्हणून त्यांच्यातल्या कुठल्याही एकीकडे जायचो.

एक आत्या सानपाड्याला राहते आणि दुसरी खारघरला. दोघींकडे पण जायचं म्हटलं तर मला अंधेरीमधून हार्बर लाईनची पनवेल ट्रेन पकडावी लागायची. जर डायरेक्ट ट्रेन मिळाली तर आपला १ तासाचा प्रवास सुखद आणि बिनकष्टाचा आहे असं समजायचं. पण तेच जर ट्रेन बदलून जावं लागलं तर

त्यासारखा त्रास दुसरा कुठलाच नाही. तुमच्यातील कोणी मुंबईमध्ये राहिलं असेल तर तुम्हांला माझं म्हणणं व्यवस्थित कळेल.

तर एके दिवशी असंच कंटाळा आला म्हणून मी आत्याकडे जायचं ठरवलं.

बॅग भरली, पैसे घेतले आणि चालत स्टेशनवर पोहोचलो. आज माझ्या सुदैवाने मला डायरेक्ट पनवेल ट्रेन मिळाली. ट्रेनमध्ये बसून मी निघालो. आज जास्त गर्दी नव्हती. पण वडाळा स्टेशन आलं आणि गुरांसारखी लोक गाडीत भरली. धक्का बुक्की चालू झाली. मी ही सगळी मजा मस्त खिडकीबाजूच्या सीटवर बसून बघत होतो. आपण बसलेलो असू आणि आजूबाजूला गर्दी असेल तर त्या बसण्याचं सुख जरा जास्त जाणवतं. असंच आजूबाजूला बघताना ट्रेनच्या दारात मला उभी असलेली एक मुलगी दिसली. दिसायला तशी छान होती. मी तिला एकदा बघितलं आणि तिचा विचार सोडून दिला. जरा झोपावं म्हटलं पण झोप लागेना. मी परत आजूबाजूला बघत बसलो. परत माझी नजर त्या मुलीवर खिळली. खरंच गोड होती ती. पण काहीतरी खटकलं मला.

तिच्या चेहऱ्यावरचे भाव खूप विचित्र होते. कदाचित ती घाबरलेली. मी नीट निरखून बघितल्यावर कळलं की एक अनोळखी माणूस तिला अडवून उभा होता. आणि तिला नको तिथे हात लावायचा प्रयत्न करत होता. ट्रेन मध्ये खूप माणसं होती. पण त्या माणसाने तिला प्रतिकार करायला जागाच ठेवली नव्हती. तिच्याकडे बघत तो त्याचा नीचपणा करत होता. कदाचित हे चाललेलं सगळं बघणारा मी एकटाच होतो.

पहिल्यांदा मी या गोष्टीकडे दुर्लक्ष केलं.

मला चुकीचं समजू नका. का केलं याचं उत्तर दिल्याशिवाय मी हा लेख संपवणार नाही.

थोड्या वेळाने परत बघितलं तर ती मुलगी पूर्णपणे रडकुंडीला आलेली आणि त्याच क्षणी आमची नजरानजर झाली. मला तिच्याकडे बघून खरंच खूप वाईट वाटलं. मी काहीही विचार न करता तिला हातानेच बोलवून माझ्या जागेवर बसायला सांगितलं. जरा सुदधा विचार न करता ती सरळ माझ्या जागेकडे आली. मी तिथून उठलो आणि जाऊन बरोबर तिच्या जागेवर जशी ती उभारली होती तसाच उभारलो. आता त्या माणसाने स्वतःहून हात काढला. त्यानंतर मी एकटक त्या माणसाकडे बघत होतो. तो माझ्याकडे बघायचा आणि परत दुसरीकडे बघायचा. थोड्यावेळाने त्याला माझ्या त्या एकटक नजरेचा एवढा त्रास व्हायला लागला की शेवटी तो पुढच्या स्टेशनवर उतरला.

या सगळ्या घटनेत कुणाची चूक होती?

असं जर मी तुम्हाला विचारलं तर तुम्ही म्हणाल की त्या माणसाची आणि काही प्रमाणात माझी सुद्धा!

पण मी म्हणतो की या प्रसंगात काही प्रमाणात ती मुलगीदेखील चुकीची होती.

या सगळ्या प्रसंगात मला काय वाटलं आणि कळलं ते सांगतो. बरोबर चूक तुम्ही ठरवा.

पहिली गोष्ट तो माणूस एक नंबर नीच होता. अशा लोकांना भर चौकात गोळ्या घातल्या पाहिजेत.

दुसरी गोष्ट मी त्या प्रसंगाकडे पहिल्यांदा दुर्लक्ष केलं कारण मला त्या माणसापेक्षा त्या मुलीचा जास्त राग आलेला. ट्रेनमध्ये पुरुष आणि स्त्रियांसाठी वेगवेगळे डबे असतात. त्या मुलीला हे माहिती नसणं शक्यच नव्हतं. मग एवढं माहिती असून पण ती पुरुषांच्या डब्यात चढली. काही माणसं किती वाईट असू शकतात याचा विचार तिने करायला पाहिजे होता.

तुम्हांला माझं एक मत सांगतो. कदाचित तुमच्यातल्या खूप लोकांना हे पटणार नाही. तुम्ही म्हणाल की आकाश मूर्ख आहे. पण ऐका!

मी खूप मुलींचं ऐकलाय की मी रात्री कितीही वाजता बाहेर एकटी फिरेन, मला पाहिजे तसे कपडे घालेन. मला कुणी थांबवायचं नाही. पण मला असं वाटतं की आपल्या आजूबाजूचा समाज खूप प्रमाणात बिघडला आहे. मान्य आहे की रात्रभर बाहेर फिरणं मुलींचा हक्क आहे पण त्या रात्रीत आपल्यावर पडणाऱ्या नजरा थांबवणं आपल्या हातात नाही. मग त्यापेक्षा जरा ऍडजेस्ट करून जर रात्रभर बाहेर नाही फिरलं तर चालणार नाही का?

लोक कधी सुधारतील माहिती नाही. पण स्वतःसाठी आपण थोड्या गोष्टी तरी नक्की करू शकतो ना?

कारण दुसऱ्याला बदलणं आपल्या हातात नसतं पण स्वतःला काही प्रमाणात बदलणं नक्की असतं.

# पाहुणा

आठवडाभर झाला, आमच्या घरी एक पाहुणा आलाय. १६ वर्षांचा पाहुणा. सध्या या त्याच्या दहावीच्या अभ्यासामध्ये त्याचं आमच्याकडे येण्याचं एकमेव कारण म्हणजे त्याचे बाबा. कारण बाबा असले तरी बाबांना कारण बनवणारी त्याची परिस्थिती आहे.

वरचं वाक्य कळलं नाही ना? नाहीच कळणार! अशा गोष्टी आपल्याला सहजासहजी कळत नाहीत. तो, त्याचा भाऊ, बहीण, आई आणि बाबा हे सगळे मिळून आमच्याच सोसायटीमध्ये राहायचे. मूळचे कोल्हापूरकर नसले तरी दोन वर्षांत त्याच्यामध्ये पण कोल्हापूरकर दिसायला लागलेला. माझा भाऊ आणि तो मुलगा एकाच शाळेत, एकाच वर्गात आहेत. त्यामुळे भावाचा मित्र म्हणून माझी आणि त्याची ओळख होण्यासाठी जास्ती वेळ नाही लागला. माझ्या काकांची आणि त्याच्या बाबांची पण चांगली ओळख झालेली. जशी जशी ओळख वाढत गेली तसं तसं त्याच्याबद्दल आणखी थोडं कळत गेलं. हे कुटुंब मूळचं पंढरपूरचं राहणारं. आजोबा माजी खासदार आणि काकांचे आणि याच्या बाबांचे वेगवेगळया प्रकारचे भरपूर बीझनेस. थोडक्यात काय तर आर्थिक दृष्ट्या एकदम खंबीर कुटुंब.

मागच्या आठवड्यात कॉलेजवरून घरी आलो आणि रोजच्या सवयीप्रमाणे स्वयंपाकघरात गेलो. आत जाताच काकी म्हणाली “त्याचे” बाबा गेले. काल रात्री हार्ट अटॅक आला आणि काही कळायच्या आधी ते सगळं सोडून गेलेले. हे ऐकून माझं डोकं सुन्न झालं. मला काहीच सुचेना. तो माणूस माझ्या जास्त ओळखीचा नसला तरी ओळखीचा मात्र नक्की होता. काकी पुढे म्हणाली की “ते सगळे पंढरपूरला गेले”. दुसऱ्या दिवशी आमच्या घरातले सगळे त्यांना जाऊन भेटले आणि त्याच्या दहावीचं

नुकसान होऊ नये म्हणून त्याला आमच्यात राहू दे, असा एक प्रस्ताव पण त्याच्या आजोबांसमोर मांडून आले. दोन दिवसांत तो आमच्याकडे रहायला आला. आता रोज माझ्या भावाबरोबर शाळेला जातो. आमच्यासोबतच खातो, पितो, झोपतो.

या प्रसंगातून मला एक गोष्ट मनापासून जाणवली की घरचा कर्ता व्यक्ती किती महत्वाचा असतो. तो गेला की क्षणात् सगळं तुटलेल्या आरशासारखं विखुरतं.

तो आमच्या घरी आल्यापासून माझं त्याच्याकडे लक्ष आहे आल्यावर आधी तो जरा लाजायचा पण आता आमच्यात त्याचं एक स्थान निर्माण झालंय. पण एक गोष्ट जी मला अजूनही खटकती, ती म्हणजे मला त्याच्या डोळ्यांत कधीच दुःख दिसलं नाही. आपण जिथे दोन वर्षे आपल्या कुटुंबाबरोबर राहिलो तिथेच आज एका मित्राच्या घरी राहायचं, याचा त्रास नसेल होत त्याला?

या प्रश्नांची दोनच उत्तर आहेत. एक म्हणजे त्याने ही परिस्थिती, घडलेलं सगळं स्वीकार केलंय.

आणि हे नसेल तर दुसरं म्हणजे त्याचं दुःख अशा थराला गेलंय की मी ते त्याच्या डोळ्यांत बघण्याच्या पात्रही नाही आहे.

# जबाबदारी

खरंतर आता मी झोपलं पाहिजे. रात्रीचे बारा वाजून गेले आहेत. आज दिवसभर तसं कामही भरपूर झालं. पण कधीकधी दिवसभर काम करूनही रात्री नाही येत झोप.

का? हे विचारू नका. कारण सगळ्या 'का'ला उत्तर नसतं.

हो! पण रात्री कितीही उशिरा झोपलो तरी सकाळी मात्र सातला उठून, आवरून, साडे आठच्या कॉलेज बससाठी आमच्या स्टॉपवर जाऊन थांबावंच लागतं.

कारण ती वेळ चुकली की बस चुकते. आणि बस चुकली की माझ्याकडे तसे दोनच पर्याय राहतात. एक तर महामंडळाने जायचं कॉलेजला किंवा परत घरी जाऊन गप्प झोपायचं.

तसा बऱ्यापैकी वेळेस मी दुसराच पर्याय निवडतो आणि स्वतःला महामंडळाच्या त्रासातून वाचवतो.

दक्षता म्हणून मी बस येण्याच्या एक दहा पंधरा मिनिटं आधीच स्टॉपला जाऊन थांबतो.

मी तिथे उभा असताना रोज एक उतारवयातले काका आपल्या सायकलवरून तिथे येतात. त्यांच्या सायकलच्या एका  बाजूला एक स्टँड आहे ज्या मध्ये एक मोठी पाईप असते. ते सायकलवरून येतात, सायकल बाजूला लावतात आणि ती पाईप रस्त्यावरच्या एका मॅनहोलमध्ये घालून गोल फिरवतात.

हे सगळं जमिनीखालच्या पाईप लाईनच्या कामासाठी चालू असतं. आता मलाही ते काय करतात हे व्यवस्थित माहित नाही. पण हे काम ते रोज येऊन करतात हे मात्र नक्की.

मला खरं तर खूपदा त्यांना त्यांचं हे काम काय आहे हे विचारावंसं वाटलंय पण मी

अजून तरी तो प्रयत्न केलेला नाही.

पण त्यांना मी हे रोज करताना बघतो. त्यांच्या अंगावर साधा शर्ट आणि विजार असते. आणि त्यांच्या बरोबरची ती सायकल.

मागच्या महिन्यात ते आलेच नाहीत. आम्हां दोघांची काहीही ओळख नाही पण मला त्यांना रोज बघायची सवय झाली. त्यांच्या न येणाच्या एक दोन दिवसानंतर एक विलक्षण गोष्ट घडली. ते स्वतः आले नव्हते पण त्यांचा मुलगा आलेला. त्यानेही तेच काम केलं जे ते करतात.

पण तो सायकलवरून नाही तर त्याच्या बाईकवरून आलेला. त्याच्या अंगातले कपडे त्या काकांच्या विजार शर्ट समोर उच्च दर्जाचे वाटत होते. तो आला, त्याने काम केलं आणि तो गेला.

हे सगळं बघून मला थोडी गंमत वाटली. कितीही नाही म्हटलं तरी त्या दोघांच्यात माझ्या मनाने एक तुलना केलीच.

मुलगा एवढा मॉडर्न आणि बाप बिचारा साधा! हे असे विचार तुमच्याही डोक्यात आले असणार.

पण त्याला इथे काही अर्थ नाही. मला असं जाणवलं की त्याने कितीही मॉडर्न कपडे घातले असले, त्याच्याकडे सायकल नसून चांगली बाईक असली तरी आजारी बाबांचं काम करायला तो स्वतः आलेला. त्याने किमान पंधरा दिवस न चुकता ते काम केलं आणि सोळाव्या दिवशी ते काका स्वतः आले.

आता ते स्वतःच येतात. पण ते नसताना त्यांचं काम थांबलं नव्हतं. भलेही त्यांचा मुलगा मॉडर्न असेल पण त्याने बाबांचं काम चालू ठेवलं.

परत तो आला नाही पण गरजेच्या वेळी तो तिथे होता.

कदाचित यालाच जबाबदारी घेणं असं म्हणतात.

# एकांत

आज वातावरण जरा विचित्रच आहे. माझ्या आजूबाजूला भरपूर गर्दी आणि गोंधळ असूनही सगळं शांत आहे. जरा ऐकायला,

वाचायला विचित्र वाटलं असेल पण मी खोटं बोलत नाही. मला कंटाळा आला की असंच वाटतं. सध्या मी आमच्या कॉलेजच्या बॅक गेट मधून आत आल्यावर बसायला असलेल्या पायऱ्यांवर बसलोय.

चिडू नका. मला एवढं माहिती आहे की पायऱ्या या चढण्यासाठी किंवा उतरण्यासाठी असतात. पण सगळया गोष्टींना काहीतरी अपवाद असतो. या मी बसलेल्या पायऱ्याही त्याचाच एक भाग आहे. या पायऱ्यांमागची खोली कायम बंद असते. त्यामुळे मी तरी त्या बसण्यासाठीच वापरतो.

मित्र यायला थोडा वेळ आहे. चला परत एकदा मागे जाऊ.

माझी दहावी झाली. जरा चांगले मार्क मिळाले आणि आमचं असं ठरलं की पुढचं शिक्षण मुंबईत करायचं. घरातल्यांना मला एक चांगला इंजिनिअर करायचं होतं. (म्हणजे अजूनही करायचं आहेच. )दहावीची सुट्टी संपल्यावर मी मुंबईला शिफ्ट झालो. पण खूपदा असं होतं की आपण जगापेक्षा किती मागे आहोत याचा आपल्याला अंदाज सुद्धा नसतो.

मी ज्या वेळी प्रवेश घेऊन मुंबईला होस्टेलला राहायला गेलो त्या वेळी कळलं की मुलांनी माझ्या आधी तीन महिने प्रवेश घेऊन अभ्यास चालू सुद्धा केलाय. हे तरी ठीक होतं, वाईट गोष्ट म्हणजे मी ज्या वेळेस माझ्या फ्लॅटवर पोहचलो त्या वेळेस ती सगळी मुलं पंधरा दिवसाची सुट्टी घेऊन घरी गेली होतीे. याचा अर्थ असा की त्या नवीन शहरात, नवीन राहण्याच्या जागेत मी एकटा होतो, अगदी एकटा!

पहिली पंधरा- वीस मिनिटं तर मला काहीच सुचलं नाही. अशा वेळेस माणसाला जरा जास्त भरून येतं. माझीही तीच परिस्थिती होती. त्या फ्लॅटमधल्या पहिल्याच दिवशी एक गोष्ट कळली की मला अंधार, रात्र, भूत यापेक्षा एकांताची जास्त भीती वाटते. आपण एकट कसं राहणार? या एका प्रश्नाने मला त्या वेळेस अगदी झपाटून सोडलेलं.

त्या काळात माझे स्वतःबद्दलचे सगळे अगदी सगळे अंदाज चुकत होते. पण माणसाची एक गोष्ट भारी आहे की तो हतबल झाला तरी थांबत नाही. प्रयत्न करत राहणे आणि मार्ग काढणे हे आपल्या सगळयांच्या रक्तातच आहे.

मी त्या काळात माझ्या मुंबईत असलेल्या आत्याकडे जाऊन येऊन करायला लागलो. एके संध्याकाळी परत आलो आणि दारासमोर उभारून किल्ली शोधताना मला जाणवलं की दरवाजा उघडाच आहे. कोणीतरी आलंय या विचाराने मला एवढा आनंद झाला की मी दरवाजा उघडून त्या बसलेल्या चार मुलांकडे हसतच उभा होतो.

विचार करा जरा, कधी तुम्हांला कुठल्या अनोळखी लोकांना बघून एवढा आनंद झालाय का? त्या आधी मलाही नव्हता झाला. एका दिवसातच आमच्या सगळयांची एवढी छान ओळख झाली की आजही ते लोक माझ्या संपर्कात आहेत.

काही लोक म्हणतात की मी अनोळखी लोकांबरोबर बोलत नाही किंवा मला लोकांबरोबर जुळवून घ्यायला वेळ लागतो. मान्य आहे काही लोकांना वेळ लागतो. पण तो वेळ का लागतो सांगू? कारण त्या वेळेस आपल्याकडे वेगळे विकल्प असतात. विकल्प नसला की माणूस परिस्थितीच्या बदलण्याची वाट न बघता स्वतःला बदलून मोकळा होतो आणि यात काहीच चुकीचं नाही.

ती मुलं मी फ्लॅटवर गेलेल्या पहिल्या दिवसापासून तिथे असती, तर कदाचित आमचं पटायला, जुळवून घ्यायला वेळ लागला असता, पण मला सुरूवातीच्या एकांताने नंतर येणाऱ्या लोकांच्या किंमतीचा हिशोब आधीच दिलेला.

त्यामुळे पुढच्या वेळेस परिस्थिती बदलण्याची वाट बघणे सोडून स्वतःला बदलूया.. .

# आठवण

माझ्यासमोर माझा भाऊ कॉम्प्युटरवर सिनेमा बघत बसलाय. खरं तर मलाही सिनेमा बघायला आवडतो पण त्याची आणि माझी आवड खूपच निराळी आहे.

त्याला सिनेमा बघताना पाहिलं आणि मला एक छान प्रसंग आठवला.

दहावीच्या परीक्षेला सुरुवात व्हायला फक्त तीन दिवस राहिलेले. कसून अभ्यास करणे म्हणजे एकंदरीत काय असतं हे मला त्या काळात कळलं. पहिलाच पेपर गणिताचा असल्यामुळे मी तर अभ्यासला लागलेलोच त्याच बरोबर माझे बाकीचे सारे मित्रही त्यातच बुडालेले.

खरं तर शेवटच्या आठवड्यात मला अभ्यासाचा खूप खूप कंटाळा आलेला. या गोष्टीला तशी खूप कारणं होती आणि त्यातलंच एक म्हणजे मागच्या महिन्याभरात झालेला अभ्यास.

एखादी गोष्ट खूप प्रमाणात केली की नंतर नंतर त्या गोष्टीवरून इच्छा उडल्यासारखी होते.

माझं पण तसंच काहीतरी व्हायला सुरुवात झालेली. त्यात कुठल्याही मित्राला फोन लावला की तो हे झालं का रे?

ते झालं का रे? मी हे केलं. ते केलं.

या शिवाय बोलणंच नसायचं.

असंच एका संध्याकाळी पुस्तक बाजूला घेेऊन बसलेलो. तेवढ्यात एका मित्राच्या फोन आला. आता फोन कुणाचा उचलायचा आणि कुणाचा नाही हेही आपलं ठरलेलं असतं.

एका खूप जवळच्या मित्राचा फोन होता. मी उचलला आणि मी काही बोलणार एवढयात तो म्हणाला “आक्या पिक्चरला जायचं का आज रात्री? “. आमच्या हुशार मित्राला त्यांच्या सोसायटीमध्ये कुठल्या तरी कार्यक्रमात पिक्चरची दोन तिकीटं मिळाली होती.

तीन दिवसांवर दहावीची परीक्षा आल्यावर मला सोडून त्याच्या बरोबर दुसरं कोण पिक्चरला जाणार?

वरती जे सांगितलं तो विनोदाचा भाग झाला. तिकीट मिळाल्यावर त्याला माझीच आठवण येणार यात काहीच शंका नाही. जाऊया म्हणून मी त्याला फोनवरच सांगितलं.

घरी नाही म्हणणार नाहीत हे माहित होतं पण परवानगी मागणं हे माझं काम होतं. ते मी केलं आणि त्या रात्री आम्ही पिक्चरला गेलो.

आज पाच वर्षांनी ही गोष्ट आठवली आणि तोंडावर एक हलकसं हसू येऊन गेलं.

त्या नंतरचा पेपर सगळयांनीच दिला. पण असे किती जण असतात ज्यांना आपण पेपरच्या दोन तीन दिवस आधी काय केलं हे आज आठवतं?

त्या वेळेला अभ्यास हा गरजेचा होताच. त्यात काहीच शंका नाही पण ही माझी आठवण मला आज त्यावेळच्या अभ्यासापेक्षा जास्त महत्वाची वाटते.

आयुष्यात वेळेप्रमाणे आपली काम तर करत राहिलीच पाहिजेत पण त्यात अशा छोट्या छोट्या आठवणी तयार करायला विसरू नका.

कारण पाच दहा वर्षांनी कदाचित ती जुनी वेळ तुम्हांला या अशा आठवणींमुळेच लक्षात राहील.

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.